# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. परशुराम नाना माने,<br>मु.पो. कोसारी, जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>**कोरम**</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. परशुराम नाना माने, मु.पो. कोसारी, जत, जि. सांगली यांनी गट क्र. ७८२ मध्ये घरगुती वीज पुरवठा मिळावा यासाठी दोन वेळा चलन भरलेले आहे. प्रथम चलन हे राजीव गांधी योजनेतून भरलेले आहे. रु. १५/– हे पावती क्रमांक ४१७९११४ दि. २.५.२००८ नुसार भरलेले आहे. त्यानंतर पी.आय. ई. योजनेतून रु. ७/– पावती क्र. ३९६१५५४ दि. ७.१२.२००९ व रु. ५०३/– हे पावती क्र. ३९६१५५५ दि. ७.१२.२००९ या नुसार दुसरे चलन भरलेले आहे व आदेश देताच चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे तक्रार क्र. ३४ दि. १५.४.२०१० रोजी दाखल केली आहे.

अंतर्गत कक्षाने आदेश दिला नाही म्हणून दि. २९.६.२०१० रोजी परिशिष्ट अ मध्ये मंचामध्ये तक्रार दाखल केली. मंचाकडून मदतीची अपेक्षा कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार कालावधीमध्ये विद्युत पुरवठा मिळावा. तसेच राजीव गांधी योजनेतून विद्युत पुरवठा मिळावा व दुसऱ्या चलनाची रक्कम परत मिळावी. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे मार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी राजीव गांधी योजनेतून घरगुती वीज कनेक्शन मिळणेसाठी प्रोसेसिंग फी रु. १५/– दि. २१.५.२०१० रोजी भरले आहेत. त्यांचे घरगुती कनेक्शनसाठी ५ पोल लागतात. त्यानी नंतर पी.आय.ई. योजनेतून कनेक्शन मिळण्यासाठी रु. ७/– व रु. ५०३/– दि. ७.१२.२००९ रोजी भरले आहेत. तक्रारदाराने घरगुती फिटींग करुन घेवून चाचणी अहवाल दिल्यानंतर ५ पोलची लाईन उभी करुन कनेक्शन देण्यात येत आहे. तक्रारदार यांनी सदरचे कनेक्शन हे पी.आय.ई. योजनेतून द्यावे व राजीव गांधी योजनेसाठी भरलेले डिपॉझीट परत मिळावे असा अर्ज वि.प.कडे दिला आहे. लेखी अहवालासोबत संयुक्त तपासणी अहवाल व तक्रारदार ग्राहकाचा विनंती अर्ज जोडला आहे.

प्रस्तुतच्या प्रकरणाची सुनावणी मंचासमोर दि. २८.७.२०१० ला घेतली असतां तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी तक्रारदार हा राजीव गांधी योजनेतून विद्युत पुरवठा मिळण्यास हक्कदार आहे, त्याने दि. २.५.२००८ रोजी चलन भरले आहे. तक्रारदाराने दुसरा अर्ज का दिला ? हे त्याला का सांगण्यात आले? याचा खुलासा केला नाही. चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली. मंचाकडे विनंती केली की, पी.आय. ई. योजनेतून वीज पुरवठा व्हावा म्हणून तक्रारदाराने भरलेले रु.५०३/– परत मिळावेत व त्यांना राजीव गांधी योजनेतून वीज पुरवठ्यासाठी भरलेल्या प्रोसेसिंग फी रु.१५/– प्रमाणे वीज जोडणी देण्यात यावी. वि.प.ने वीज जोडणी देण्याची तयारी दर्शविली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी असे प्रतिपादन केले की, एजन्सी काम वेळेत करीत नाही त्यामुळे विलंब होत आहे. तक्रारदाराच्या अर्जावरुनच त्यांना राजीव गांधी योजनेऐवजी पी.आय.ई. योजनेतून वीज जोडणी देण्यासाठी कोटेशन देण्यात आले आहे, त्यामुळे तक्रार निकाली काढणेत यावी अशी विनंती केली आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार हा मागणी केल्याप्रमाणे दुसऱ्या चलनाची भरलेली रक्कम रु. ५०३/– परत मिळण्यास हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या लेखी/ तोंडी कथनानुसार तक्रारदार यांनी मे २००८ मध्ये राजीव गांधी योजनेतून वीज जोडणीसाठी चलन रु. १५/– भरले होते हे मान्य केले आहे. तक्रारीत स्पष्ट केले नसले तरी, तक्रारदार हा राजीव गांधी योजनेतील अटीप्रमाणे लाभार्थी आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या प्रस्तुत योजनेनुसार तक्रारदार यांस राजीव गांधी योजनेतून विद्युत पुरवठा मिळणे जरुरी आहे. परंतु वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ज्यांना काम दिले आहे ते कॉन्ट्रॅक्टर किंवा एजन्सी वेळेवर काम करीत नाहीत त्यामुळे विलंब होतो, त्यामुळे तक्रारदार यांनी दि. ७.१२.२००९ ला पी.आय.ई. योजनेतून वीज जोडणी मिळण्यासाठी रु. ५०३/– व रु. ७/– भरलेले आहेत.

अंतर्गत कक्षाने ग्राहक तक्रारीवरील निर्णय दिला नाही असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालासोबत तक्रारदाराचा दि. ९.७.२०१० च्या अर्जाची झेरॉक्स प्रत जोडली आहे. तक्रारदाराचे घरगुती वीज कनेक्शनसाठी ५ पोल लागतात. त्यांनी पी.आय.योजनेतून वीज जोडणीसाठी दि. ७.१२.२००९ रोजी पैंसे भरलेले आहेत. त्यामुळे घरगुती कनेक्शन राजीव गांधी योजने ऐवजी पी.आय.ई. योजनेतून देण्याचा अर्ज त्यांनी दि. ७.१२.२००९ रोजी दिला आहे असे गृहीत धरता येईल. तक्रारदाराने मंचाकडे तक्रार दाखल केल्यानंतर पी.आय.ई. योजनेतून विद्युत पुरवठा करणेसाठी तक्रार नसल्याबद्दल अर्ज दिला आहे व पूर्वी भरलेली डिपॉझीट परत मिळावी अशी मागणी केली आहे. वि.प.च्या दि. १.७.२०१० च्या संयुक्त तपासणी अहवालामध्ये घरगुती फिटींग केले नाही ते केल्यावर व चाचणी अहवाल मिळाल्यानंतर वीज जोडणी देण्यात येईल असे नमूद केले आहे. तसेच अहवालात म्हटल्याप्रमाणे ५ पोलची लाईन उभी करुन विद्युत पुरवठा देण्यात येत आहे त्यामुळे तक्रारदाराची वीज पुरवठ्याच्या मागणीची विनंती वि.प.ने मान्य केली आहे, अर्थात ती कृती मानकातील तरतुदीनुसारच्या कालावधीत नाही.

या तक्रारीतील वैशिष्ट्ये ( peculiarity ) लक्षांत घेता, तक्रारदाराची केंद्र शासनाच्या राजीव गांधी योजनेतून रु.१५/– भरुन वीज जोडणी मिळावी अशी मागणी आहे, त्यास तो हक्कदार आहे. वीज जोडणीस विलंब होत असल्यामुळे दि. ७.१२.२००९ रोजी तक्रारदार यांनी रु. ५०३/– भरुन परत दुसरे चलन भरले आहे. अशा परिस्थितीत दि. ९.७.२०१० ला पी.आय.ई. योजनेतून विद्युत पुरवठा मिळावा त्यास हरकत नाही असा अर्ज तक्रारदाराने देणे अशक्य आहे. कदाचित, पी.आय.ई. योजनेतून वीज जोडणीचा आपला हक्क रहावा म्हणून नवीन चलन डिसेंबरमध्ये भरले आहे. केंद्र सरकाच्या राजीव गांधी योजनेच्या लाभापासून तक्रारदार ग्राहकास वंचित ठेवता येत नाही. त्यांना रु. १५/– प्रोसेसिंग फी भरुन वीज जोडणी मिळणे जरुरी आहे. त्यांच्यावर रु. ५०३/– + रु. ७/– = रु. ५१०/– चा बोजा लादणे हे केंद्र सरकारच्या योजनेच्या Letter of spirit च्या विरुध्द आहे. तथापि, तक्रारदार यांनी योजना बदलास संमत्ती देवून तक्रार नाही असे लिहून दिले आहे. असे असले तरी, त्यांनी पी.आय.ई. योजनेसाठी भरलेले रु. ५०३/–+ रु. ७/– = रु.५१०/– त्यांना परत मिळणे गरजेचे आहे वितरण कंपनीने रु.१५/– प्रोसेसिंग फी भरलेला त्यांचा पूर्वीचा अर्ज ग्राह्य धरुन नियमाप्रमाणे त्यांना वीज जोडणी द्यावी. तक्रारदाराने योग्य व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करुन चाचणी अहवाल द्यावा. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे दि. ७.१२.२००९ रोजी भरलेले चलन रु. ५०३/– + रु.७/– = रु. ५१०/– वि.प.ने त्यांस परत द्यावे व राजीव गांधी योजनेतून वीज जोडणीबाबतचा त्यांचा अर्ज विचारांत घेवून रु. १५/– प्रोसेसिंग फी जमा करुन तक्रारदारांस प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी देण्यात यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष